ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

# बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता आणि सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

***डॉ. राजमाने कस्तूर आणि ** प्रा. अनिल नारायण निघोट**

*मार्गदर्शक, ** सहाय्यक प्राध्यापक, . एम.ए. खान कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड्.), मंचर

**सारांश:**

आजच्या काळात भावनिक स्थैर्य व बुद्धिमत्ता यांचा शिक्षक, विद्यार्थी आणि शास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने विचार करता डॅनिअल गोलमनचे ५ घटक जसे आत्मभान, स्वनियंत्रण, स्वयंप्रेरणा, सहसंवेदना आणि सामाजिक कौशल्ये तर जॉन मेअर आणि साळवी यांनी स्वओळख, भावनांचे उपयोजन, भावना समजून घेणे व त्यांचे व्यवस्थापनास भावनिक बुद्धिमत्तेत महत्व दिलेले दिसते. बुद्धिमत्तेचे सर्जनशील, उपयोजित, शैक्षणिक, सामाजिक आणि भावनिक असे ५ प्रकार पडतात. गोलमनच्या मते *Emotional intelligence refers to the capacity for cognitively our own filling and those for motivating ourselves and for managing emotions well in ourselves and in our relationship* (जगताप – 2017) म्हणजेच विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाची जबाबदारी शिक्षक, शाळेवरही असते. यातून विद्यार्थी शिक्षकांची (ST) भावनिक बुध्दिमत्ता विकसित झाल्यास व्यक्तीच्या त्याच्या मार्गातील अडथळे सर्वांच्या सहकार्याने दूर करून समाधान व यश मिळते. (गोलमन – 1995) यासाठी संशोधकाने पेठे, हैद व धर यांच्या चाचणीद्वारे भावनिक बुद्धिमत्ता जाणून घेऊन सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठित कार्यक्रमाच्या (CLP) अंमलबजावणीने EQ मध्ये सकारात्मक बदल दिसून आला. संशोधकाने बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता जाणून सामाजिक (पेरेज – 2005) ज्ञानरचना वादाचा आधारे असलेली (दलिप सिंह – 2008) विद्यार्थी शिक्षकांनी उद्दिष्टपुर्तीसाठी एकत्र येऊन करण्याच्या सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रमनिर्मिती व त्याचा परिणाम अभ्यासला आहे.

**मुख्य संज्ञा :** भावनिक बुद्धिमत्ता (EQ), सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठित कार्यक्रम, CLP, विद्यार्थी शिक्षक (ST)

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्रस्तावना:

आजच्या एकविसाव्या शतकात, स्पर्धा युगात दैनंदिन जीवनातील भावनांचे व्यवस्थापन न जमल्यास आत्महत्या, हिंसकता, नैराश्य अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. परीक्षा, प्रात्यक्षिक, व्यवसाय यांतील अपयश किंवा वेळ कमी व कामे जास्त परिस्थिती आल्यास व्यक्ती बेचैन होऊन भावनिक संतुलन हरविल्यामुळे त्यांच्या हातून विध्वंस, अमानुषता, आत्मक्लेश,

आत्मघात होण्याची अनेक उदाहरणे आहेत.

सदर संशोधनात संशोधक विद्यमान विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता जाणून त्यावर त्यांच्या अभ्यासक्रमातील घटकांवरच कार्यक्रम निर्मिती करून ती राबवून त्याचा उपयोग दर्जेदार अभ्यास साहित्य निर्मितीस, भावी आयुष्यात आपल्या विद्यार्थ्यांना अधिक जाणून घेऊन त्यांच्यात भावनिक बुद्धिमत्ता व सहकार्यात्मक अध्ययन विकसित करण्यासाठी होतो का? हे अभ्यासणे गरजेचे आहे.

**संशोधनाची गरज :**

१) शिक्षण शिक्षक संस्थेत अध्यापन करत असताना विविध भागातून आलेल्या बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांस जुळवून घेवून, समायोजन, अभ्यासक्रमाचे कामकाज पूर्ण करणे यातून त्यांचा मानसिक ताण वाढून चिडचीड वाढते. (बोराटे- 2010, पीएच.डी.)

२) हे विद्यार्थी शिक्षक मनाप्रमाणे न घडल्यास किंवा एखादे काम पुन्हा करावे लागल्यास एकदम अस्वस्थ बनून एकाकी बसणे, आजारी पडणे असे प्रकार वाढतात. (चव्हाण- 1999, पीएच.डी.)

३) विद्यार्थी शिक्षकांवर कामाचा ताण वाढल्यास आपले काम कसे होणार? शिवाय शिक्षक व पालकांच्या अपेक्षा, सहध्यायींचे असहकार्य त्यातून द्वेष, मत्सर व क्वचित प्रसंगी भांडणे होऊन भावनिकदृष्ट्या संतुलन बिघडल्याने नको ती कृती घडते व नंतर पश्चातापाची वेळ येते. (गोलमन- 1995)

४) यातून अध्ययन करताना विद्यार्थी शिक्षकांनी एकमेकांना अध्ययनात सहकार्य व मदत केल्यास गुणवत्ता व प्रगतीत भर पडेल. या विचारातून संशोधकास भावनिक बुद्धिमत्ता व अध्यापन सुलभतेसाठी सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रम निर्मितीची वेळ व दर्जेदार कामासाठी गरज भासते. (अवचर- 2010, पीएच.डी.)

५) सध्याचे काही शालेय विद्यार्थीही एकलकोंडे, स्मार्टफोन-गेम्स, व्यसनात गुरफटलेले दिसतात व पाहिजे ते मिळाले नाही तर विध्वंसक प्रवृत्ती वाढते यावर हे बी.एड्. विद्यार्थी शिक्षक त्यांच्या सर्वच भावी विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता विकसनासाठी सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रम निर्मिती करून राबवतील ज्यातून ती मुले एकत्र येऊन आपले सुखदुख एकमेकांना, पालकांना, शिक्षकांना सांगतील व स्वनियंत्रण शिकवतील. (तावरे- 2010, पीएच.डी.)

**संशोधनाचे महत्व :**

**A. प्राध्यापक :**

१) सदर संशोधनातून प्राध्यापकास भावनिक बुद्धिमत्ता जाणणे व विकसनाची गरज व महत्व समजण्यास मदत झाली.

२) सदर संशोधनातून प्राध्यापकास भावनिक बुद्धिमत्ता जाणून व त्याच्या विकसनासाठी सहकार्यात्मक अध्ययनाची

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

गरज व महत्व जाणवले.

३) प्रस्तुत संशोधनातून प्राध्यापकास भावनिक बुद्धिमत्ता कमतरतेमुळे मागे पडलेल्या विद्यार्थ्यांच्या विकसनासाठी सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रमांच्या उपयुक्ततेचे महत्व लक्षात आले.

**B. विद्यार्थी शिक्षक :**

१) सदर संशोधनातून बी. एड्. विद्यार्थी शिक्षकास आपली भावनिक बुद्धिमत्ता किती आहे, हे समजेल व त्यातून भावनिक बुद्धिमत्ता विकसनाचे महत्व समजले.

२) सदर संशोधनातून बी. एड्. विद्यार्थी शिक्षकास आपल्या भावनिक बुद्धिमत्ता विकसनासाठी सहकार्यात्मक अध्ययनाची गरज व महत्व समजले.

३) प्रस्तुत संशोधनातून बी. एड्. प्रशिक्षणार्थ्यांस आपल्या भावनिक बुद्धिमत्ता विकसनपर सहकार्यात्मक अध्ययनाचे महत्व लक्षात येऊन भावी शिक्षकांस आपल्या भावी विद्यार्थ्यांच्या अध्यापनात उपरोक्त गोष्टींचे महत्व समजले.

**समस्या शीर्षक :**

बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता आणि सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) शिक्षक शिक्षणसंस्थेतील विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता शोधून तुलना करणे.

२) बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता विकसनासाठी सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रमांची निर्मिती करणे.

३) बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता विकसनासाठी राबविलेल्या सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रमांची परिणामकारकता तपासणे.

**संशोधन परिकल्पना :**

बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता विकसनासाठी सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रम निर्मिती करून राबविल्यामुळे भावनिक बुद्धिमत्ता विषयक पूर्व व उत्तर चाचणीतील मध्यमानात सार्थ फरक आढळून येईल.

**शून्य परिकल्पना :** बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता विकसनासाठी सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रम निर्मिती करून राबविल्यामुळे भावनिक बुद्धिमत्ता विषयक पूर्व व उत्तर चाचणीतील मध्यमानात लक्षणीय फरक पडत नाही.

**पूर्व संशोधनाचा आढावा :** या संशोधन अभ्यासासाठी अरोरा, आर.के. (1992), केम्प डाऊन (2001), पाटील नलिनी

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

(2007), जोशी सुप्रिया (2003), तावरे मनिषा (2010), बोराटे मनोज (2010), अवचर सीमा (2010), खानविलकर कल्याणी (2011) यांच्या पूर्व संशोधनांचा अभ्यास केला. तर भावनिक बुद्धिमत्ता विकसन व सहकार्यात्मक ध्ययनाधिष्टीत कार्यक्रम निर्मितीसाठी आगाशे ललिता (2010) सहकार्यात्मक अध्ययन, नाईक संजय (2001) भावनिक बुद्ध्यांक व भावनिक बुद्धिमत्ता, सिंह दलिप (2008) भावनिक बुद्धिमत्ता, आलेगावकर प.म. (2000) प्रगत क्रीडा मानसशास्त्र सदर संदर्भ ग्रंथ व पूर्व संशोधनांचा अभ्यास करण्यात आला. यावरून असे आढळून आले की, भावनिक बुद्धिमत्ता व सहकार्यात्मक अध्ययनावर या घटकांवर संशोधन झाले आहे. पण भावनिक बुद्धिमत्तेवर सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रमाचा अभ्यास संशोधकास आढळला नाही.

**संशोधन कार्यपद्धती :**

सदर संशोधन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील बी.एड्. अभ्यासक्रमाची 16 महाविद्यालये निवडून त्यातील कोणताही पक्षपात न करता संभाव्यता आधारित लॉटरी पद्धतीने डॉ. एम.ए. खान कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड्.) मंचर येथील 50 विद्यार्थी शिक्षकांची एकल गट अभिकल्प म्हणून निवड केली. प्रथम पेठे, हैद व धर यांच्या प्रमाणित भावनिक बुद्धिमत्ता चाचणी ज्याची विश्वसनीयता 0.86 आहे व मापन विधानांना पूर्णतः सहमत (5), सहमत (4), अनिश्चित (3), असहमत (2), पूर्णतः असहमत (1) अशी 34 विधाने या चाचणीत आहेत. या विद्यार्थी शिक्षकांची पेठे, हैद व धर यांच्या प्रमाणित भावनिक बुद्धिमत्ता चाचणीने सर्वेक्षण पद्धतीने भावनिक बुद्धिमत्ता विषयक पूर्व चाचणी घेऊन त्यांच्यात सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रमाचा भावनिक बुद्धिमत्तेत काय फरक पडतो यासाठी तज्ञ मार्गदर्शकांच्या सहकार्याने साधन निर्मिती पद्धतीने तयार केलेल्या सहकार्यात्मक अध्ययनाधिष्टीत कार्यक्रमाची उपचारात्मक उपक्रम म्हणून उपाययोजना करण्यात आली व प्रायोगिक संशोधन पद्धतीद्वारे भावनिक बुद्धिमत्तेची उत्तर चाचणी प्रायोगिक गटावर घेतली. अशाप्रकारे संशोधकाने सर्वेक्षण, साधन निर्मिती व प्रायोगिक संशोधन पद्धतीने अशा बहुपद्धतींचा संशोधकाने प्रस्तुत संशोधनात वापर केलेला आहे.

**भावनिक बुद्धिमत्ता विकसनासाठी सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठित कार्यक्रमाची रूपरेषा :**

| उपक्रम | सहकार्यात्मक अध्ययन पद्धती/तंत्र | उपक्रमाची उद्दिष्ट्ये | सहकार्यात्मक अध्ययनपर घटक | भावनिक बुद्धिमत्तापर घटक | प्राधान्यक्रम | वेळ | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) गटचर्चा व जबाबदारी वाटप प्रात्यक्षिक-मानवी हक्क जपणूक करणारी संस्था म्हणून स्थळ भेट | 1.विद्यार्थी गट अध्ययन<br>2.एकत्र अध्ययन<br>३.चर्चा व माहिती वितरण | 1.विद्यार्थी शिक्षकांनी प्रात्यक्षिक कार्यपूर्तीसाठी एकत्र येणे | 1.सकारात्मक परस्परावलंबीत्व<br>2.वैयक्तिक जबाबदारी | 1.स्वजाणिव<br>2.परानुभूती<br>3.जबाबदारी<br>4.सबंध हाताळणी | चर्चा व दर्जेदार कार्यपूर्ती | शेवटचे घड्या ळी 2 तास | 1 महिना |

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV

JULY – AUGUST 2022

Original Research Article

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2.जबाबदारी वाटप व पार पाडणे | | | | | |
| 2) अभिरूप पाठांसाठी गटचर्चा, भूमिकावाटप, सांघिक अध्यापन, सादरीकरण त्रुटींवर चर्चा पुन:सादरीकरण | 1.विध्यार्थी गट गट शोधकता<br>2.अंतर्गत व बाह्य वर्तुळाकार रचना | 1.विद्यार्थी शिक्षकांनी आपली भूमिका जाणणे<br>2.स्वत:स मिळालेली जबाबदारी पार पाडणे | 1.आंतरव्यक्तीक छोट्या गटातील कौशल्य<br>2.गट प्रक्रिया | 1.स्वप्रेरणा<br>2.स्व:विकास<br>3.स्थितीज्ञान<br>4.निस्वार्थी वर्तन | सांघिक कृती व जबाबदारीचे तत्व | शेवटचे घड्याळी 2 तास | 1 महिना |
| 3) तंत्रज्ञानाधारित पाठांसाठी आवश्यक बाबींवर गटचर्चा तंत्रज्ञानाधारित अध्यापन चर्चा पुन:सादरीकरण | 1.वैयक्तिक जबाबदारी<br>2.समोरासमोर आंतरक्रिया | 1.स्वकौशल्य विकसित करणे<br>2.पुरक माहिती मिळविणे<br>3.प्रभावी सादरीकरण करणे | 1.सकारात्मक परस्परावलंबित्व<br>2.वैयक्तिक जबाबदारी | 1.स्वजाणिव<br>2.निस्वार्थी वर्तन<br>3.प्रामाणिकपणा | सांघिक कृती व वैयक्तिक जबाबदारीचे तत्व | शेवटचे घड्याळी 2 तास | 1 महिना |
| 4) सृजनात्मक पाठांसाठी आवश्यक बाबींवर गटचर्चा स्वयं. अध्ययनपर पाठ अध्यापन चर्चा पुन:सादरीकरण | 1.गटात्मक खेळ<br>2.विद्यार्थी गट अध्ययन<br>3.एकत्रित अध्ययन | 1.स्वकौशल्य विकसित करणे<br>2.आवश्यक माहिती मिळविणे<br>3.प्रभावी सादरीकरण करणे | 1.समोरासमोर आंतरक्रिया<br>2.वैयक्तिक जबाबदारी<br>3.गटप्रक्रिया | 1.परानुभूती<br>2.स्थितीज्ञान<br>3.जबाबदारी<br>4.भावनिक स्थिरता | हेतू समजल्याच्या तत्वाची खात्री व अध्ययन घटक निश्चिती | शेवटचे घड्याळी 2 तास | 1 महिना |
| 5) उपक्रम-निबंध गटचर्चा व विषय वाटप आणि माहिती संकलन विषय- मानवी हक्क व सादरीकरण | 1.विद्यार्थी गट अध्ययन<br>2.एकत्र अध्ययन<br>3. गट चर्चा<br>४.गट शोधन कार्य | 1.स्वकौशल्य विकसित करणे<br>2.आवश्यक माहिती मिळविणे<br>3.प्रभावी अहवाल लेखन व सादरीकरण करणे | 1.समोरासमोर आंतरक्रिया<br>2.वैयक्तिक जबाबदारी<br>3.गटप्रक्रिया<br>4.आंतरव्यक्तीक/ छोट्या गटातील कौशल्य | 1.स्वविकास<br>2.परानुभूती<br>3.स्थितीज्ञान<br>4.जबाबदारी<br>5.संबंध हाताळणी | विषयाचा आवाका निश्चिती व मिळालेली जबाबदारी पार पाडणे | शेवटचे घड्याळी 2 तास | 1 महिना |

प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणीतील भावनिक बुद्धिमत्तेवरील परिणाम पाहण्यासाठी सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रम पाच महिने राबविला. ज्यात गटचर्चा, स्थळभेट, चर्चा, भूमिका वाटप, सादरीकरण, गट शोधन, एकत्रित अध्ययन, गट अध्ययन, गट खेळ, बैठक रचना, गट शोधकता असा कार्यक्रम आमलात आणल्यानंतर प्रायोगिक गटाची भावनिक बुद्धिमत्ता उत्तर चाचणी घेऊन पूर्व व उत्तर चाचणीतील फरक जाणून घेतला.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal
OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

**सांख्यिकी विश्लेषण :**

प्रायोगिक गटातील 50 बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता पूर्व चाचणी व सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रमाच्या अंमलबजावणी नंतरची उत्तर चाचणी यातील प्राप्तांकांची केंद्रीय प्रवृत्ती, विचलनशीलता व t value

**Paired T for Experimental Group (Pre & Post)**

| गट | विद्यार्थी संख्या (N) | मध्यमान (M) | प्रमाण विचलन (S. D.) | Paired t-value df = 49 | Table t-value 0.05 level | Sig. (2 tailed) |
|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | 50 | 136.84 | 15.1743 | 3.54 | 2.00 | Significant |
| उत्तर चाचणी | 50 | 142 | 9.9057 | | | |

सारणीवरून असे दिसून येते की, प्राप्त t-value i.e. 3.54 (df = 49) ही table t-value 2.00 पेक्षा जास्त असल्याने 0.05 सार्थकता स्तरावर सार्थ आहे. याचा अर्थ शून्य परिकल्पनेचा त्याग केला व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. तसेच If P value < $\alpha = 0.05$, then Reject H0 Here, P = 0.00 < $\alpha = 0.05$ याचा अर्थ शून्य परिकल्पनेचा त्याग केला व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. म्हणजेच बी. एड्. प्रशिक्षणार्थ्यांवर वर्गाध्यापानात सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रमामुळे एकल गटावर प्रायोगिक पूर्व चाचणीपेक्षा उत्तर चाचणीतील गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रम परिणामकारक ठरला व विद्यार्थ्यांच्या एकल गटातील बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या पूर्व चाचणीपेक्षा उत्तर चाचणीतील भावनिक बुद्ध्यांकात वाढ झाली.




**निष्कर्ष :**

१) डॉ. एम. ए. खान बी. एड्. कॉलेज येथील प्रायोगिक एकल गटातील विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्ता पूर्व व उत्तर चाचणीवरून प्रथम वर्ष व पुल्लिंगी बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता मध्यम स्वरुपाची आढळते.

२) या विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्ता चाचणीवरून द्वितीय वर्ष व स्त्रीलिंगी बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

बुध्दिमत्ता चांगल्या स्वरुपाची आढळते.

३) प्राप्त t-value i.e. 3.54 (df = 49) ही table t-value 2.00 पेक्षा जास्त असल्याने 0.05 सार्थकता स्तरावर सार्थ आहे. म्हणजेच पूर्व व उत्तर चाचणीतून सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रम परिणामकारक ठरल्याने बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत लक्षणीय फरक आढळला.

४) म्हणजेच भावनिक बुद्धिमत्ता विकसनासाठी राबविलेल्या सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रमातून भावनिक बुद्धिमत्ता विकसित झाली.

**चर्चा :**

बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता पूर्व चाचणी नंतर आणि सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रमाच्या अंमलबजावणी नंतर घेतलेल्या उत्तर चाचणीतून विद्यार्थी शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत सकारात्मक परिणामकारकता दिसून आली.

**संदर्भसूची :**

आगलावे, प्रदिप (2000) ***संशोधनपद्धती शास्त्र व तंत्रे*** (द्वितीय आवृत्ती) पुणे : विद्याप्रकाशन

आगाशे, ललिता (2010) ***सहकार्यात्मक अध्ययन: गट अध्यापन*** (प्रथम आवृत्ती) पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन

आलेगावकर, प.म. (2000) ***प्रगत क्रिडा मानसशास्त्र.*** पुणे : कॉन्टीनेन्टल प्रकाशन

बापट, भा.गो. (1996) ***मूल्यमापन आणि संख्याशास्त्र.*** पुणे : व्हिनस प्रकाशन

भिंताडे, वि. रा. (2009) ***शैक्षणिक संशोधन पद्धती.*** पुणे : नित्यनूतन प्रकाशन

https://positivepsychologyprogram.com (06/09/2022)

लेख : What is Emotional intelligence and how to improve it?

https://www.ihhp.com (07/09/2022)

लेख : What is Emotional intelligence, Daniel Goleman

https://study.com (08/09/2022)

*Cite This Article:*

***डॉ. राजमाने कस्तूर आणि ** प्रा. अनिल नारायण निघोट (2022).*** बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता आणि सहकार्यात्मक अध्ययनाधिष्ठीत कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास, ***Educreator Research Journal, Volume–IX, Issue– IV,*** *July – August 2022, 123-129.*